अनुसूचित जाती व नवबौध्द
घटकांसाठी घरकुल योजनेची
अंमलबजावणी करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
परिपत्रक क्रमांक-बीसीएच-२००९/ प्र.क्र.१५९/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक २ ऑगस्ट,२०११

वाचा : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक-बीसीएच-२००८/ प्र.क्र. ३६/ मावक-२, दिनांक १५/११/२००८

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक-बीसीएच-२००९/ प्र.क्र. १५९/ मावक-२, दिनांक ९/३/२०१०

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग पूरक पत्र क्रमांक-बीसीएच-२००९/ प्र.क्र.१५९/ मावक-२, दिनांक ६/८/२०१०

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक-बीसीएच-२००९/ प्र.क्र. १५९/ मावक-२, दिनांक २/१२/२०१०

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातील ग्रामिण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील लोकांसाठी संदर्भाधीन अनुक्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये "अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना" सुरु करण्यात आलेली आहे. उपरोक्त शासन निर्णय अनुक्रमांक-२ ते ४ येथील शासन निर्णय व पुरक पत्रान्वये सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच सदरहू योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या (DRDA) यंत्रणांना लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरहू योजनेंतर्गत करावयाच्या घरकुलाच्या बांधकामास आवश्यक तेवढी गती येत नसल्याचे वेळोवेळी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये आढळुन आलेले आहे. ग्रामिण क्षेत्रामध्ये जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत, नगरपालिका क्षेत्रामध्ये म्हाडामार्फत व महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका तथा MMRDA क्षेत्रात, मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) घरे बांधुन देण्याची योजना आहे. तथापि नगरपालिका क्षेत्रामध्ये व महानगरपालिका क्षेत्रामध्ये योजनेला पाहिजे त्या प्रमाणात गती प्राप्त न झाल्याने या योजनेची प्रभावीप्रमाणे अमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने या परिपत्रकान्वये पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

**परिपत्रक :-**

- ग्रामिण भागामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांना जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत घरे बांधुन देण्याचा निर्णय झालेला आहे. लाभार्थी स्वतः घरे बांधण्यास तयार असतील तर त्यांना अनुदान देवून

प्रथम प्राधान्याने लाभार्थ्यांमार्फतच घरे बांधण्यात यावी. मात्र, काही अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत लाभार्थ्यांची तयारी नसल्यास, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेने निवड केलेल्या बांधकाम व्यवसायातील नामांकित संस्था/ स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत घरांचे बांधकाम करण्यास हरकत नसावी. तथापि, अशा संस्थांची अंतीम निवड करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करावा व शासन मान्यतेने अशा संस्थांकडून घरांचे बांधकाम करावे.

- नगरपालिका क्षेत्रात प्रथम प्राधान्याने लाभार्थी यांना स्वत: बांधकाम करण्यास द्यावे. त्यासाठी लाभार्थ्यांस अनुदान देण्यात यावे. लाभार्थ्यांनी असमर्थता दर्शविल्यास महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास महामंडळ (म्हाडा) किंवा नगरपालिकेने स्वत: बांधकाम करावे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत ज्यावेळी लाभार्थी म्हाडा किंवा नगर परिषद यांची बांधकाम करण्याची तयारी नसेल तर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने नियुक्त केलेल्या बांधकाम व्यावसायिक नामांकित संस्था / स्वयंसेवी संस्थामार्फत घरांचे बांधकाम करण्यात यावे. सदरहू संस्थांची निवड करण्यापूर्वी त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

- महानगरपालिका क्षेत्रात प्रथम प्राधान्याने लाभार्थी यांना स्वत: बांधकाम करण्यास द्यावे. त्यासाठी लाभार्थ्यांना बांधकाम अनुदान देण्यात यावे. लाभार्थ्यांने असमर्थता दर्शविल्यास म्हाडा / एमएमआरडीअे किंवा महानगरपालिकेमार्फत बांधकाम करण्यात यावे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत ज्यावेळी लाभार्थी / म्हाडा/ एमएमआडीअे किंवा महानगरपालिका बांधकाम करण्यास तयार नसतील त्यावेळी आयुक्त, महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखालील समितीने नियुक्त केलेल्या बांधकाम व्यवसायातील नामांकित संस्था/ स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत घरांचे बांधकाम करावे. तथापि, अशा संस्थांची अंतीम निवड करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करावा व शासन मान्यतेने अशा संस्थांकडून घरांचे बांधकाम करण्यात यावे.

वरीलप्रमाणे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीस गती येण्यासाठी संबंधित यंत्रणेने आवश्यक कार्यवाही करावी.

हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक क्रमांक २०११०८०२१९११११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स. स. बेनके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे कार्यालय
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव (ग्रामविकास)ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपुर
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपुर
सर्व विभागीय आयुक्त
सचिव, गृहनिर्माण यांचे स्वीय सहाय्यक
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकारण, ब्रांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, बांद्रे (पुर्व), मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
वित्त विभाग (व्यय-१४/ अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
सर्व आयुक्त, महानगर पालिका
मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/ नगर परिषद
निवड नस्ती मावक-२

------------